MHPU250002572016

दाखल तारीखः २७.०१.२०१६
नोंदणी तारीखः २७.०१.२०१६
निकाल तारीखः ०९.०७.२०२६
कालावधीः १० **व.** ०५ **म.** १२ **दि.**

**न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, जुन्नर यांचे न्यायालय**
**(पिठासिन अधिकारीः अनंत हिंमतराव बाजड)**

**नियमित फौजदारी खटला क्रं. २१/२०१६** **(निशाणी क्रं. १९)**

गुन्हा क्रमांक १०/२०१६ भा. दं. वि. कलम ३५४, ३२४, ३२३, ५०४ व ५०६ प्रमाणे. पोलीस स्टेशन **ओतूर.**

**अभियोगपक्ष** **महाराष्ट्र शासन,**
तर्फे पोलिस स्टेशन अधिकारी,
पोलीस स्टेशन **ओतूर**,
ता.जुन्नर, जि. पुणे.

**सरकार पक्षातर्फे** : **श्री. एम. एस. घोडके**
**सहा. सरकारी वकिल,**

**आरोपी** **गुलाब रामभाऊ भोर**
उ.व. ६५ वर्षे, व्यवसायः शेती,
रा. हिवरे बु., ता. जुन्नर, जि. पुणे.

**आरोपींतर्फे** : **श्री. के. जी. गोसावी, विधीज्ञ.**

| | |
|---|---|
| गुन्हयाची तारीख | १३.०१.२०१६ |
| प्रथम खबर अहवाल तारीख | १३.०१.२०१६ |
| दोषारोपपत्र दाखल केल्याची तारिख | २१.०१.२०१६ |
| दोषारोप ठेवल्याची तारीख | ०५.०२.२०२० |
| पुरावा सुरु झाला ती तारीख | १३.०३.२०२० |
| प्रकरण न्यायानिर्णयाकरीता ठेवली ती तारीख | ०९.०७.२०२६ |
| न्यायनिर्णयाची तारीख | ०९.०७.२०२६ |

| शिक्षेची तारीख व इतर काही | निरंक |
|---|---|

| अ. क्र. | आरोपीचे नाव | अटकेची तारीख | जमानतीवर सोडल्याची तारीख | दोषारोप मधील कलम | आरोपी निर्दोष किंवा दोषी | दिलेली शिक्षा | कलम ४२८ सी. आर. पी. सी. प्रमाणे सुट मिळण्याचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | गुलाब रामभाऊ भोर | २०.०१.२०१६ | २०.०१.२०१६ | वरीलप्रमाणे | निर्दोष | निरंक | निरंक |

अभियोग पक्षातर्फे साक्षीदारांची यादी

| अनु. क्र. | नांव | स्वरुप |
|---|---|---|
| ०१ | अरविंद नामदेव भोर, सरकारी साक्षीदार क्र. १ | साक्षीदार |
| ०२ | रामकृष्ण काशीनाथ शिंदे, सरकारी साक्षीदार क्र. २ | पंच साक्षीदार |

बचाव पक्षातर्फे साक्षीदारांची यादी

| अनुक्रमांक | नांव | स्वरुप |
|---|---|---|
| | निरंक | |

न्यायलयातर्फे घेण्यात आलेल्या साक्षीदारांची यादी

| अनुक्रमांक | नांव | स्वरुप |
|---|---|---|
| | निरंक | |

अभियोग पक्षातर्फे कागदोपत्री पुरावा

| अनुक्रमांक | निशाणी क्र. | स्वरुप |
|---|---|---|
| | निरंक | |

बचाव पक्षातर्फे कागदोपत्री पुरावा

| अनुक्रमांक | निशाणी क्र. | स्वरुप |
|---|---|---|
| | निरंक | |

न्यायलयातर्फे दस्तऐवजांना देण्यात आलेल्या निशाणी क्रमांक

| अनुक्रमांक | निशाणी क्र. | स्वरुप |
|---|---|---|
| | निरंक | |

गुन्हयात वापरलेली वस्तु

| अनुक्रमांक | वस्तु | स्वरुप |
|---|---|---|
| | निरंक | |

## न्या य नि र्ण य
## (दिनांक ०९.०७.२०२६ रोजी घोषित)

. प्रस्तुतचा खटला आरोपीविरूध्द भारतीय दंड संहितेचे कलम ३५४, ३२४, ३२३, ५०४ व ५०६ प्रमाणे शिक्षापात्र गुन्हयाकरीता चालविण्यात आला आहे.

**०२.** सरकार पक्षाचे थोडक्यात कथन असे आहे की, दिनांक १३.०१.२०१६ रोजी सायंकाळी ०४.०० वाजताच्या सुमारास भोरवाडी हिवरे बु. ता. जुन्नर गावच्या हद्दीत फिर्यादी **क्ष** ही तिच्या शेताकडे जात असताना पाटाजवळ आरोपी पाठीमागुन सायकलवर आला व तिच्याजवळ थांबुन तिला शिवीगाळ करु लागला. त्यावर फिर्यादीने तुला काय म्हणायचे आहे असे विचारले असता आरोपीने "थांब तुझ्याकडे बघतो" असे म्हणुन त्याने तिची गचांडी धरुन खाली पाडले व तिचे ब्लाऊज फाडुन तिचे मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य केले. फिर्यादीने त्याला बाजुला ढकलले तेव्हा त्याने फिर्यादीला पुन्हा शिवीगाळ करत चप्पलने छाती व तोंडावर मारहाण केली व "आमचे घरात रहायचे नाही, घर माझ्या आईचे आहे, तु निघुन जा नाही तर तुला सोडणार नाही" अशी दमदाटी केली. त्यामुळे फिर्यादीने त्याचदिवशी आरोपीविरुध्द ओतूर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. त्यावरुन अपराध क्र. १०/२०१६ कलम ३५४, ३२४, ३२३, ५०४ व ५०६ भा. दं. वि. प्रमाणे दाखल करण्यात आला. ह्या गुन्हयाचा तपास श्री. के. एस. पाटोळे, पोलीस हवालदार ह्यांचेकडे सोपविण्यात आला. त्यांनी घटनास्थळ पंचनामा तयार केला, साक्षीदारांचे जबाब नोंदविले व तपासाअंती आरोपीविरूध्द आरोपपत्र न्यायालयात दाखल केले.

**०३.** माझे पुर्व पिठासीन अधिकारी यांनी आरोपीविरूध्द भा. दं. वि. चे कलम ३५४, ३२४, ३२३, ५०४ व ५०६ खाली (निशाणी क्रं. ०६) दोषारोप ठेवला आहे. आरोपीला त्याचेविरूध्दचा दोषारोप वाचून दाखविला असता त्याने गुन्हा नाकबुल केला व खटल्यास सामोरे जाण्याची तयारी दर्शवीली. पुराव्याअंती आरोपीविरुध्द जाणारा काहीही पुरावा न आढळुन आल्याने आरोपीचे फौ. प्र. संहितेचे कलम ३१३ (१) (ब) प्रमाणे निवेदन वगळण्यात आलेले आहे.

**०४.** सरकारी अभियोक्ता श्री. एम. एस. घोडके व आरोपीचे विधीज्ञ श्री. के. जी. गोसावी यांचा युक्तीवाद ऐकला. दोन्ही पक्षाचा युक्तीवाद व अभिलेखावरील पुरावे यावरून खालील मुद्दे माझे निदर्शनास आले असून त्यावरील निष्कर्ष मी खालील कारणासह नोंदवित आहे.

| अ. क्र. | मुद्दे | | निष्कर्ष |
|---|---|---|---|
| १. | आरोपीने फिर्यादीच्या अंगाला झटापट करुन तिला अश्लील भाषेत शिवीगाळ करुन तिला लज्ञा वाटेल असे कृत्य केल्याचे सरकार पक्षाने सिध्द केले काय ? | .. | **नाही.** |
| २. | आरोपीने फिर्यादीला चपलेने मारहाण करुन तिला स्वेच्छापुर्वक दुखापत केल्याचे सरकार पक्षाने सिध्द केले काय ? | .. | **नाही.** |
| ३. | आरोपीने फिर्यादीला हाताने मारहाण करुन त्याला स्वेच्छापुर्वक दुखापत केल्याचे सरकार पक्षाने सिध्द केले काय ? | .. | **नाही.** |
| ४. | आरोपीने फिर्यादीला शिवीगाळ करुन तिला गुन्हा करण्यास चिथावणी दिल्याचे सरकार पक्षाने सिध्द केले काय ? | .. | **नाही.** |
| ५. | आरोपीने फिर्यादीला जिवे मारण्याची धमकी दिल्याचे सरकार पक्षाने सिध्द केले काय ? | .. | **नाही.** |
| ६. | अंतिम आदेश ? | .. | **आरोपीला निर्दोष मुक्त करण्यात येते.** |

## कारणमिमांसा

**०५.** सरकार पक्षाचा पुरावा निशाणी क्रं.१ वरील दि.१८.०२.२०२६ रोजीचे आदेशानुसार बंद करण्यात आला.

**<u>मुद्दा क्र.१ ते ५ बाबतः</u>**

**०६.** सर्व मुद्दे एकमेकांशी संलग्न असल्याने एकत्र विचारार्थ घेतले आहेत. फिर्यादी **क्ष** हिला समन्सची बजावणी होऊन सुध्दा ती हजर झाली नाही. साक्षीदार क्रं. १ आरविंद नामदेव भोर याने त्याला घटनेबाबत काहीही माहित नसल्याचे सांगुन सरकार पक्षाला मदत केली नाही. सहाय्यक सरकारी वकीलांनी त्याला उलट तपासाच्या स्वरुपात प्रश्न विचारुन सुध्दा त्याने घटनेबाबत काहीही सांगितले नाही. सा.क्र. २ रामकृष्ण हा पंच साक्षीदार आहे. त्याच्या पुराव्यात असे आले आहे की, त्याला पाटोळे साहेब यांनी भोरवाडी येथे पंचनामा करण्यासाठी बोलाविले होते. त्याठिकाणी त्याच्यासमक्ष घटनास्थळ पंचनामा नि.क्र.१३ करण्यात आला. उलटतपासादरम्यान त्याने पोलीसांनी त्याला सह्या करण्यास सांगितले. त्यामुळेच त्याने सह्या केल्या व त्याव्यतिरीक्त त्याला काहीही माहित नसल्याचे सांगितले.

**०७.** वरिल साक्षीदारांच्या पुराव्यामधून आरोपीविरूध्द ठेवण्यात आलेला दोषारोप सिध्द करण्यासाठी आवश्यक तो पुरावा आलेला नाही. फिर्यादी व इतर साक्षीदार तसेच तपासअधिकारी यांना समन्स पाठवुन सुध्दा ते पुराव्याकामी हजर झालेले नाहीत. त्यामुळे प्रकरणात आरोपीविरुध्द ठेवण्यात आलेले आरोप सिध्द होऊ शकले नाही. हयामुळे मी मुद्दा क्रं. १ ते ५ चे निष्कर्ष नकारार्थी नोंदविले आहेत.

**<u>मुद्दा क्र. ६ बाबतः</u>**

**०८.** मी हयापूर्वीच आरोपीविरुध्द ठेवण्यात आलेले आरोप सिध्द होऊ शकलेले नाही, असे निरिक्षण नोंदविले आहे. त्यामुळे आरोपी हा निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहे. आरोपीकडुन कलम ४३७–अ फौ. प्र. संहीता प्रमाणे बंधपत्र घेण्यात आले आहे. वरील सर्व विवेचनानंतर मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**<u>आ दे श</u>**

**.** आरोपी गुलाब रामभाऊ भोर ह्याला फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम २४८(१) प्रमाणे भा.दं.वि. चे कलम ३५४, ३२४, ३२३, ५०४ व ५०६ चे गुन्हयातून निर्दोष मुक्त करण्यात येत आहे. आरोपी यापुढे

स्वतंत्र आहे.

. आरोपीचे बंधपत्र व जामिनपत्र रद्द करण्यात येत आहे.

. आरोपीकडुन कलम ४३७–अ फौ. प्र. संहीता प्रमाणे घेण्यात आलेले बंधपत्र दोन महीन्यांकरीता कार्यान्वीत असेल व त्यानंतर ते रद्द समजले जाईल.

. न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by ANANT HIMMATRAO BAJAD
Date: 2026.07.09 11:59:16 +0530

जुन्नर
दि.०९/०७/२०२६

**(अनंत हिम्मतराव बाजड)**
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, जुन्नर